जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ३७०  दिनांक - १८/०५/२०२३**

## पीसीबी,गुन्हे शाखा,पुणे शहर अंतर्गत एमपीडीए कारवाई

## विमानतळ पोलीस ठाणे परिसरात दहशत माजविणा-या, दोन अट्टल गुन्हेगारांवर मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांची एम.पी.डी.ए. अन्वये स्थानबध्दतेची कारवाई

पुणे शहरातील विमानतळ पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये गुन्हे करणारे अट्टल गुन्हेगार नामे **१.गणेश उर्फ गणी सखाराम राखपसरे,वय-१९ वर्षे,रा.राखपसरे वस्ती,लोहगाव,पुणे २.नितीन किसन सकट,वय-२१ वर्षे,रा.राखपसरे वस्ती,लोहगाव,पुणे** हे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहेत.त्यांनी त्यांच्या साथीदारांसह विमानतळ पोलीस स्टेशनच्या हद्दीत **पिस्टल,लोखंडी रॉड,कोयता** या सारख्या जीवघेण्या हत्यारांसह **खुनाचा प्रयत्न,दुखापत,वाहनांची तोडफोड,दंगा,बेकायदेशीर हत्यार बाळगणे** यासारखे गंभीर स्वरुपाचे गुन्हे केले आहेत.मागील ०५ वर्षामध्ये त्यांचेविरूध्द प्रत्येकी ०३ गुन्हे दाखल आहेत.त्यांच्या गुन्हेगारी कृत्यांमुळे सदर परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण झालेली होती.तसेच त्यांच्यापासुन जीविताचे व मालमत्तेचे नुकसान होईल या भितीमुळे नागरिक उघडपणे तक्रार करण्यास धजावत नव्हते.

प्राप्त प्रस्ताव व सह कागदपत्रांची पडताळणी करुन **मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार** यांनी **नमुद इसमांचे विरुध्द एम.पी.डी.ए. कायद्यान्वये अनुक्रमे नागपूर मध्यवर्ती कारागृह,नागपूर व अमरावती मध्यवर्ती कारागृह,अमरावती येथे ०१ वर्षाकरीता स्थानबध्दतेचे आदेश पारीत केले आहेत.**नमूद इसमांना स्थानबध्द करण्यामध्ये श्री.विलास सोंडे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,विमानतळ पो.स्टे.पुणे शहर व वरिष्ठ पोलीस निरीक्षक,पी.सी.बी.गुन्हे शाखा,पुणे शहर यांनी कामगिरी पार पाडली.

मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर यांनी दहशत निर्माण करणाऱ्या व सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण करणाऱ्या अट्टल गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले आहे. **मा.पोलीस आयुक्त यांनी कार्यभार स्विकारल्यानंतर एम.पी.डी.ए.कायद्यान्वये स्थानबध्दतेच्या १७ कारवाई असुन,**यापुढेही सराईत व अट्टल गुन्हेगारांचे कृत्यांना आळा घालण्यासाठी प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात येणार आहे.